| फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ०२/२०२४ मधील निशाणी क्र.२० खालील आदेश (सोनाबाई रामदास बेल्हेकर वि. रमेश रामदास बेल्हेकर व इतर) | MHAH150000662024 |
|---|---|

सदरचा अर्ज सामनेवाला क्र. १ याने त्याच्या विरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द करण्याकरीता व म्हणणे दाखल करण्यास परवानगी मिळण्याकरीता दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जासोबत सामनेवाला क्र. १ याचे शपथपत्र जोडलेले आहे.

२. सामनेवाला क्र. १ याने सदर अर्जात कथन केले आहे की, सामनेवाला क्र. १ यास महत्वाची कागदपत्रे व माहिती वेळेत उपलब्ध न झाल्याने तो प्रस्तुत अर्जामध्ये मुदतीत हजर झाला नाही. त्यामुळे त्याच्याविरूध्द एकतर्फा आदेश पारीत करण्यात आला आहे. प्रस्तुत अर्जामध्ये सामनेवाला क्र. १ याचे म्हणणे देणे न्यायाच्या दृष्टीने गरजेचे आहे. तसे न झाल्यास सामनेवाला क्र. १ यास न्यायहक्कापासून वंचीत राहावे लागणार आहे. सबब, अर्ज मंजूर करण्यात यावा.

३. अर्जदारातर्फे प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल केले की, सदरचा अर्ज खरा व कायदेशीर नाही. अर्जातील कारण खरे व योग्य नाही. सबब, अर्ज नामंजूर करावा. मंजूर केल्यास रक्कम रुपये २०००/– दंड आकारण्यात यावा.

४. सदरचा अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. उभय पक्षकारांचा युक्तीवाद ऐकला. सामनेवाला क्र. १ याच्याविरूध्द दिनांक ०८/०१/२०२५ रोजी एकतर्फा आदेश पारीत केलेला आहे. त्यास सामनेवाला क्र. १ याने प्रस्तुत अर्जामध्ये कारण दिले आहे की, महत्वाचे कागदपत्रे व माहिती वेळेत उपलब्ध न झाल्याने तो न्यायालयात हजर राहू शकला नाही. सदर करणाच्या पृष्ठ्यर्थ सामनेवाला क्र. १ याने कोणताही कागदोपत्री पुरावा दिलेला नाही. असे असले तरी प्रस्तुत अर्ज हा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ नुसार अर्जदाराने सामनेवाला याचेकडून पोटगी मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. सदरचा अर्ज गुणदोषावर पुर्णतः निकाली काढण्याकरीता दोन्ही बाजूचे म्हणणे अभिलेखावर असणे

आवश्यक आहे. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीने प्रस्तुत अर्ज मंजूर करणे योग्य व रास्त ठरेल. त्याचबरोबर प्रस्तुत अर्जामध्ये दिनांक ०८/०१/२०२५ रोजी एकतर्फा आदेश पारीत केलेला असून दिनांक २१/०२/२०२५ रोजी सामनेवाला याने प्रस्तुत अर्ज दाखल केलेला आहे. सबब, सामनेवाला याने केलेल्या उशिराबाबत त्यास जास्तीत जास्त दंड आकारणे योग्य व रास्त ठरेल. सबब, खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे–

**आदेश**

१. सामनेवाला क्र. १ याच्या विरुध्द झालेला एकतर्फा आदेश दंडासह रद्द करण्यात येतो.

२. सामनेवाला क्र. १ याने अर्जदारास दंडापोटी रक्कम रुपये ५००/– (रक्कम रुपये पाचशे फक्त) पुढील तारीख किंवा तत्पुर्वी दयावेत.

३. सामनेवाला क्र. १ याने वरीलप्रमाणे आदेशाची पुर्तता केल्यानंतर त्याचे म्हणणे अभिलेखावर घेण्यात येईल.

४. सामनेवाला क्र. १ याने वरील आदेशाप्रमाणे पुढील तारखेस पुर्तता न केल्यास सदरचा आदेश रद्द समजण्यात यावा.

SANDHYA YUVRAJ SUL
Digitally signed by SANDHYA YUVRAJ SUL
Date: 2026.03.09 17:22:37 +0530

(**संध्या यु. सुळ**)

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र. २, नेवासा

ठिकाण– नेवासा
दिनांक – ०९/०३/२०२६